भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १११/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०२/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक १५/०२/२०१७ चे ००.०५ ते ०४.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी मयुर लक्ष्मण साठकर वय २० वर्ष, रा. खेटा जि. नागपुर ह. मु. मनोज श्रीराम धांडे रा. उज्ज्वल नगर मुरमाडी ही आपली मोटार सायकल क्र. एमएच ४० एएन/९२३२ किंमती ४०,०००/–रु. ची काळया रंगाची हिरो पॅशन प्रो ही घराचे समोर खुल्या जागेत ठेवली असता कोणीतरी अज्ञात आरोपीने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) घराचा दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन सामानाची चोरी . :–**

दिनांक १४/०२/२०१७ चे १७.०० ते १५/०२/२०१७ चे रात्र. दरम्यान. यातील फिर्यादी नितीन बाबुराव हातझाडे वय २१ वर्ष, रा. वार्ड नं. १ गंगा नगर मुरमाडी हे आपले कुंटुबासह मावशीकडे पारडी (मुर्झा) जिल्हा गोंदीया येथे लग्नाचे कार्यक्रमाला दिनांक १४/०२/२०१७ ला गेले होते. की दिनांक १५/०२/२०१७ ला परत आल्यावर घराच्या समोरील दाराचा कोंडा तुटलेला दिसला असतांना घरात आत जावुन पाहीले असता गोदरेज आलमारीतील ठेवलेले सोन्याचे झुमके ०४ ग्रॅम, सोन्याचे कानातील जुने रिंग ३.५ ग्रॅम, सोन्याच्या कुडया, सोन्याचे टॉप्स १.५ ग्रॅम, चांदीचे तीन सिक्के, नगदी ९,३००/–रु. असा एकुण २२,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात आरोपीने समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५७,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) लोखंडी सलाखीने पाठीखाली मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०२/२०१७ चे २२०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी अरविंद कुंडलीक शेंन्द्रे वय ३० वर्ष, रा. मागली हा जिल्हा परीषद शाळेजवळ उभा असतांना यातील आरोपी हा तु भावाचे भरोश्यावर खातेस यावर फिर्यादीने आरोपीस तुझ्या वडीलाने तुझा लग्न करुन दिला तुम्ही नवरा बायको वडीलांच्या भरोश्यावर खाता असे म्हटल्यावर आरोपीने चिडुन लोखंडी सलाखीने फिर्यादीचे पाठीखाली कमरेच्या वर मारुन जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक १५/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, तुमसर, सिहोरा व दिघोरी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २९ लिटर हातभट्टी दारु किंमती २,१७०/–रु. व ३ लिटर ५१० मिली लीटर देशी दारु किंमती ९७५/–रु. असा एकुण किंमती ३,१४५/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

16.2

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.